# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 07.08.2024** **वार – बुधवार**

---

अर्थसहाय्य

पुणे जिल्ह्याच्या जुन्नर तालुक्यातल्या कुकडेश्वर आदिवासी हिरडा औद्योगिक उत्पादक सहकारी संस्थेला दोन कोटी रुपये अर्थसहाय्य म्हणून देण्याचा निर्णय राज्य शासनानं घेतला आहे. आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. कुकडेश्वर आदिवासी हिरडा औद्योगिक उत्पादक सहकारी संस्थेच्या माध्यमातून हिरडा या वनोत्पादनावर प्रक्रिया करून औषध तयार करण्यात येणार आहे.

कांदा

पुणे जिल्ह्यातल्या कांदा उत्पादक आणि निर्यातदारांसाठी बांगला देशातल्या उठावामुळे मोठा आर्थिक फटका बसला आहे. बांग्लादेश हा सर्वाधिक कांदा आयात करणारा देश होता. दरवर्षी किमान 6 ते 7 लाख टन कांद्याची निर्यात बांग्लादेशात होत होती, मात्र सध्या तिथं निर्माण झालेल्या राजकीय पेच प्रसंगाचे परिणाम भारतीय बाजारपेठेवर दिसून येत आहेत. कांद्याची निर्यात थांबल्यास देशांतर्गत बाजारपेठेतले कांद्याचे दर मोठ्या प्रमाणावर कोसळतील अशी भीती व्यक्त होत आहे.

पीक नुकसान

राज्यात जुलै महिन्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे खरीप हंगामातल्या एक लाख 44 हजार हेक्टर क्षेत्रावरच्या पिकांचं नुकसान झालं आहे. सुमारे पाचशे हेक्टर क्षेत्रावरील जमीन पुराच्या पाण्याखाली गेल्याचं राज्य कृषी विभागाच्या प्राथमिक अहवालात नमूद करण्यात आलं आहे.

खड्डे

गेले काही दिवस झालेल्या संततधार पावसामुळे पुणे शहरात रस्त्यांना खड्डे पडल्यामुळे वाहतूक कोंडी होत आहे. या पार्श्वभूमीवर शहरातल्या 30 रस्त्यांवर ट्रॅक्टर, जेसीबी, रोड रोलर या सारख्या संथ गतीनं चालणाऱ्या वाहनांना सकाळी 9 ते रात्री 10 वाजेपर्यंत बंदी घालण्यात आली आहे. वाहतूक विभागाच्या पोलीस आयुक्तांनी याबाबतचे आदेश दिले आहेत.

पिंपरी आयुक्त

पिंपरी चिंचवड शहरात पावसामुळे विविध भागातून रस्त्यांवर खड्डे पडणे, कचरा अडकून रस्त्यात पाणी साचणे अशा तक्रारी येत आहेत. या पार्श्वभूमीवर आयुक्त शेखर सिंह यांनी प्रशासनाला तातडीनं कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या आहेत. खड्डे बुजवण्यासाठी फिरते पथक नेमण्यात येणार आहे. तसंच राडारोडा टाकणे, रस्त्यांमध्ये बेकायदेशीरपणे खोदकाम करणे, चर खोदणे असे प्रकार आढळून आल्यास संबंधितांवर दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे.

उपवास पदार्थ
श्रावण महिन्यात उपवासाचे पदार्थ खरेदी करताना त्यांच्यावरील मुदत पाहूनच खरेदी करा असा सल्ला अन्न आणि औषध प्रशासन विभागानं दिला आहे. पदार्थामध्ये भेसळ आढळल्यास किंवा विक्रेत्यानं एमआरपीपेक्षा जादा पैसे घेतल्यास त्याची रीतसर लेखी तक्रार करावी असं आवाहन अन्न आणि औषध प्रशासनानं केलं आहे.

माजी सैनिक उपक्रम
महसूल पंधरवड्यानिमित्त येत्या शनिवारी पुणे जिल्हा सैनिक कल्याण मंडळानं सैनिकहो तुमच्यासाठी या कार्यक्रमाचं आयोजन केलं आहे. आजी माजी सैनिक, वीरमाता, वीरपत्नी यांच्यासाठी तालुकास्तरावर तहसीलदारांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम होईल. यावेळी त्यांना आवश्यक असणारे विविध दाखले, प्रमाणपत्रं, घर आणि शेतीकरता जमीन वाटपाबाबतच्या प्रलंबित समस्या यावर कार्यवाही करुन प्रलंबित प्रकरणं तत्काळ निकाली काढण्यात येणार आहेत. जिल्ह्यातल्या आजी माजी सैनिकांनी, वीरपत्नी, वीरमातांनी ओळखपत्रासह लेखी अर्जाच्या दोन प्रती घेऊन तहसील कार्यालयात उपस्थित राहावं, असं आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी लेफ्टनंट कर्नल हंगे यांनी केलं आहे.

अवयवदान जनजागृती
भारतीय अवयवदान दिनानिमित्त पुण्यातल्या बी. जे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि ससून सर्वोपचार रुग्णालयात 15 जुलै ते 5 ऑगस्ट दरम्यान अवयवदान जनजागृती अभियान राबवण्यात आलं. या अभियानात विविध स्पर्धांसोबतच रॅली, व्याख्यानमाला आयोजित करण्यात आल्या होत्या.

आचार्य अत्रे जन्मशताब्दी
आचार्य अत्रे यांच्या शतकोत्तर रौप्यमहोत्सवी जन्मदिनानिमित्त येत्या 13 ऑगस्ट रोजी ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे यांचा काँग्रेसचे ज्येष्ठ नेते सुशीलकुमार शिंदे यांच्या हस्ते सत्कार करण्यात येणार असून यावेळी भावे यांचं प्र. के. अत्रे नाबाद 125 याविषयावर व्याख्यान होईल. पुण्यातील संवाद संस्था आणि महाराष्ट्र साहित्य कला प्रसारिणी सभेनं हा कार्यक्रम आयोजित केला आहे.

बुद्धीबळ-सीमा
शालेय स्तरावरील जिल्हा बुद्धिबळ स्पर्धेत चौदा वर्षाखालील मुलींच्या गटात पाचव्या फेरी अखेर निहिरा कौल, सई देव, चतुर्थी परदेशी, ओवी पावडे यांनी संयुक्त आघाडी घेतली आहे. पुणे महापालिका आणि जिल्हा क्रीडा परिषदेनं ही स्पर्धा आयोजित केली आहे. या स्पर्धेत महापालिकेच्या शाळेतल्या दर्शना हरपळे, आरोही काळे, समृद्धी थिटे आणि झोया अन्सारी दुसऱ्या स्थानावर खेळत आहेत.

हवामान-आयएमडी
पुणे शहर आणि परिसरात आज हलका ते मध्यम स्वरुपाचा पाऊस झाला. कमाल तापमान 28 तर किमान तापमान 22 अंश सेल्सिअसच्या आसपास होतं. उद्याही आकाश अंशतः ढगाळ राहील आणि पावसाच्या हलक्या ते मध्यम सरी पडतील असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू संध्याकाळी सहा वाजता विविध भारती पुणे केंद्रावर ताज्या पुणे वृत्तांतमधे. नमस्कार.